दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ७२ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 2 Noc 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 72 | Pages 4 | Rate 4 Rs


### सत्ताधारी पक्षाला मिर्ची का लागते?

**मुंबई**–काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, निवडणूक पारदर्शक व्हावी, निवडणुकीत मतदार याद्यांमध्ये पारदर्शकता असायला हवी. त्यांच्याकडून मतदार याद्यांमध्ये काही चूक आहे असे मानायला तयारच नाही ते सरकारचे पार्टनर असल्यासारखे वागत आहेत. आमच्या शिष्टमंडळाने यावर त्यांना प्रश्न विचाराला तेव्हा त्यांच्याकडे काहीच उत्तर नव्हते.एकाच घरात ४००-४०० लोकं कसे राहू शकतात हा घोळ कुणी केला कुणाच्या इशाऱ्यावर केला. यावर आम्ही निवडणूक आयोगाला उत्तर मागतो तेव्हा मिर्ची मात्र सत्ताधारी पक्षाला लागते, जसे काही ते यांचे वकील आहेत, असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

# सत्याचा मोर्चा विरोधाचा नव्हे, जागृतीचा–जबाबदारीचा आवाज

## शरद पवारांकडून ऐतिहासिक संदर्भ देत संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाशी तुलना

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबईत मतदार याद्यांमधील घोळ, मतचोरी आणि दुबार नावे या गंभीर मुद्द्यांवरून उसळलेल्या जनक्षोभाच्या पार्श्वभूमीवर सत्याचा मोर्चा निघाला. महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येत राज्य निवडणूक आयोगाच्या विरोधात हे आंदोलन छेडले. हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी फॅशन स्ट्रीटपासून मुंबई महानगरपालिका मुख्यालयापर्यंत रॅली काढली. मतदार नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमिततेविरोधात आणि पारदर्शक निवडणुकीच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या ऐतिहासिक मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस आणि मनसेचे नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात नवा संदेश गेला आहे.




मोर्चातील मार्गदर्शनपर भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी लोकशाहीच्या रक्षणाचा मुद्दा पुढे करत कार्यकर्त्यांना एकजुटीचा संदेश दिला. देशाची लोकशाही टिकवण्यासाठी कष्ट करायला तयार असलेले तुम्ही सर्व बंधू-भगिनी, तुमचा हा संघर्ष मला इतिहासाची आठवण करून देतो, असं सांगत त्यांनी या आंदोलनाला ऐतिहासिक संदर्भ जोडला. पवार म्हणाले की, आजचा मोर्चा मला १९७८-८९ च्या काळात घेऊन जातो. त्या काळात मी महाविद्यालयात शिकत होतो. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळी काळा घोडा परिसरात असेच मोर्चे निघाले होते. त्या काळातील एकजूट आणि विचारांचा समन्वय आज तुमच्यात दिसत असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.शरद पवारांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आजचा मोर्चा हा कोणत्याही पक्षासाठी सत्ता मिळवण्याचा प्रयत्न नसून लोकशाही रचनेच्या रक्षणासाठीचा सामूहिक आवाज आहे. आपण स्वतःसाठी काही मागत नाही, सत्ता किंवा पदासाठीही नाही. आपण फक्त एवढंच म्हणतोय की संविधानाने दिलेले मतदानाचे अधिकार सुरक्षित राहिले पाहिजेत, असं ते म्हणाले. निवडणूक आयोगावर अप्रत्यक्ष टीका करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, संविधानात सांगितलेले नियम सत्ताधाऱ्यांच्या मनाप्रमाणे वाकवले गेले तर लोकशाहीचं भविष्य धोक्यात येईल. त्यामुळे, जनतेने सावध राहून निवडणुकीच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी दबाव निर्माण करण्याची गरज असल्याचं त्यांनी नमूद केलं.

### सत्याचा मोर्चा हा फक्त विरोधाचा नव्हे, तर जागृतीचा आणि जबाबदारीचा आवाज

**मोर्चाच्या अखेरीस शरद पवारांनी सर्व कार्यकर्त्यांना शांततेच्या मार्गाने लोकशाहीच्या रक्षणासाठी लढा देण्याचं आवाहन केलं. ही लढाई कुणा एका पक्षाची नाही, ही लढाई संविधान आणि लोकशाही वाचवण्याची आहे, असा ठाम संदेश त्यांनी दिला. सत्याचा मोर्चा हा फक्त विरोधाचा नव्हे, तर जागृतीचा आणि जबाबदारीचा आवाज असल्याचं ते म्हणाले. या मोर्चातून राज्यभरात लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला असून, निवडणूक आयोगावर दबाव वाढवण्यात महाविकास आघाडी आणि मनसेला यश मिळाल्याचं म्हटलं जात आहे.**

# शासकीय कापूस खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ माजलगाव बाजार समितीच्या प्रयत्नांना यश

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वतीने शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्रीसाठी नोंदणीची मुदत दि. ३१ ऑक्टोबर पर्यंतच होती. परंतु माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच. एन. सवणे यांनी सिसीआयशी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दखल घेत सिसीआयने दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणीची मुदतवाढ दिली असल्याने शेतक-यांना दिलासा मिळाला आहे.



हवामानातील अनिश्चितता, हंगामाच्या शेवटपर्यंत झालेला पाऊस आणि शेतकऱ्यांची कापूस वेचणी सुरू न झाल्याने मोठ्या संख्येने शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर माजलगाव बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उउख तसेच कृषी खात्याकडे वेळो - वेळी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दाखल कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सिसीआय) ने घेत शासकीय कापूस खरेदी नोंदणीची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ वरून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे माजलगाव तालुक्यातील तसेच अनेक भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, कापूस हमीभावाने विक्रीसाठी अधिक शेतकरी नोंदणी करू शकतील. ३१ डिसेंबर पर्यंत झालेल्या मुदतवाढीत शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त नोंदी करून घ्याव्यात व नोंदी पासून कोणीही शेतकरी बांधवांनी वंचित राहू नये असे आवाहन उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव चे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच. एन. सवने यांनी केले आहे.

# सातारा, सोलापूरसह राज्यातील सर्व जिल्हा परिषदांवर भाजपचा झेंडा फडकावा:जयकुमार गोरे यांचे वक्तव्य

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सातारा, सोलापूरसह महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा फडकावा हाच आमचा अजेंडा आहे, असे भाजपचे नेते जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार आहे की काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.जयकुमार गोरे म्हणाले की, फलटणमध्ये संपदा मुंडे या ताईने आत्महत्या केली या प्रकरणी आपण राजकारण करणे योग्य नाही. संपदाताईंना न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांची आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पहिल्या दिवसापासून तपास झाला पाहिजे आणि आमच्या भगिनीला न्याय मिळावा अशी भूमिका घेतली आहे. विरोधकांनी तपास यंत्रणांवर जेव्हा प्रश्नचिन्ह निर्माण केले तेव्हा सकाळीच मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली होती. त्यांनी एसआयटीची घोषणा केली आहे त्यामध्ये महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तपास होईल आणि सत्य आपल्या समोर येईल असा मला विश्वास आहे.जयकुमार गोरे म्हणाले की, संपदा ताई यांच्या मृत्यू-साठी जबाबदार असणाऱ्यांना १०० टक्के शिक्षा झाली पाहिजे.राजकारणात अस्तित्व गमावलेल्या लोकांनी संपदांच्या आडून पुन्हा आपले राजकीय पुनर्वसन होतंय का याची चाचपणी करत त्या पद्धतीने प्लॅनिंग करत काही उद्योग करू नये. ही घटना वेगळी आहे तिचा तपास होत त्या ताईला न्याय मिळाला पाहिजे, या पाठीमागे काय कारण होते यासाठी तिन्ही मोबाईल तपासले जातील. त्यामधील चाट तपासले जाईल त्यातून या घटनेचा संपूर्ण उलगडा पोलिसांना होईल. पण याचे वेगळे राजकारण करण्याची गरज नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.बीड जिल्ह्यातील रहिवासी व फलटण येथे आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन पोलिस महासंचालकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार, हा संपूर्ण तपास एका महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथकाकडून केला जाईल. वडवणी तालुक्यातील रहिवासी व फलटण (जि. सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टरने काही दिवसांपूर्वी आत्महत्या केली होती.या प्रकरणामध्ये अनेक महत्त्वाच्या आणि मोठ्या नावांचा समावेश असल्याने पीडित डॉक्टरच्या कुटुंबासह विरोधकांनी सातत्याने या आत्महत्येच्या घटनेची एसआयटी चौकशी करण्याची मागणी लावून धरली होती. नि:पक्ष तपासासाठी विशेष तपास पथक नेमणे आवश्यक आहे, असा विरोधकांचा युक्तिवाद होता.

# आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक रामराव भोगजकर यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक,वारकरी संप्रदायाचा पुरस्कार करणारे वारकरी रामराव येडबा भोगजकर वय १०५ वर्ष यांचे शनिवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशी दिवशी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.त्यांच्यावर आनंदगाव येथे शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.सांप्रदायिक क्षेत्रा तील निष्ठावान वारकरी, कष्टाळू प्रेमळ स्वभावाचे अण्णा सर्वपरिचित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी,पाच मुले सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.ते जनक,माणिक,शंकर आश्रूबा,उद्योजक पांडुरंग भोगजकर यांचे वडील होत.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शिवसेना उद्धव ठाकरेंची, राष्ट्रवादी शरद पवारांची:भाजप नेते चंद्रकांत पाटील यांचे वक्तव्य चर्चेत; टीकेमुळे मित्रपक्षांमध्येही थोडीशी अस्वस्थता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे झालेल्या एका कार्यक्रमात भाजपचे वरिष्ठ नेते आणि उच्च व तांत्रिक शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष शरद पवारांचा आणि शिवसेना हा पक्ष उद्धव ठाकरेंचा, असे विधान करत त्यांनी पुन्हा एकदा राजकीय चर्चेला तोंड फोडले. विशेष म्हणजे, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या फुटीनंतर पक्ष कोणाचा, चिन्ह कोणाचे आणि वारसा कोणाचा या प्रश्नावर गेल्या काही महिन्यांपासून तीव्र संघर्ष सुरू आहे. अशातच पाटील यांनी थेट पवार आणि ठाकरे यांच्या नावाने पक्षाची ओळख दिल्याने, हे वक्तव्य राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.चंद्रकांत पाटील यांनी या कार्यक्रमात भाजपच्या संघटनात्मक स्वरूपावर विशेष भर दिला. भाजप हा कोणत्याही व्यक्तीचा खासगी पक्ष नाही. तो अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी किंवा नरेंद्र मोदी यांचा पक्ष नाही. हा पक्ष कार्यकर्त्यांचा आहे, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे म्हटले की, भाजपमध्ये निर्णय हे एखाद्या व्यक्तीच्या मनाने होत नाहीत. देशभरातील हजारो कार्यकर्त्यांच्या श्रम आणि विचारांवर पक्ष उभा आहे. म्हणूनच हा पक्ष एखाद्या नेत्याच्या नावाने नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या ताकदीने ओळखला जातो. त्यांच्या या विधानातून अप्रत्यक्षपणे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या नेतृत्त्व केंद्रीकरणावर, त्यांनी टीकास्त्र सोडल्याचं दिसून आलं.दरम्यान, पाटील यांनी महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय समीकरणांवरही भाष्य करत विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. आज विरोधकांच्या मनात काही आणि ओठांवर काहीतरी वेगळं आहे. मतदार याद्यांतील घोळ आणि ईव्हीएमच्या मुद्द्यावर ते लोकांमध्ये संशय निर्माण करत आहेत. पण सत्तेपासून दूर गेल्यानंतरच त्यांना सिस्टीम दोषी वाटू लागली, अशी टीका करत त्यांनी विरोधकांचा मोर्चा राजकीय स्टंट असल्याचं म्हटलं. ते पुढे म्हणाले की, लोकसभेच्या निवडणुकीत ४१ जागा मिळाल्यावर सिस्टीम बरोबर वाटते, पण विधानसभेला पराभव झाला की ईव्हीएममध्ये घोटाळा दिसतो. हे दुटप्पी वर्तन असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निधी तात्काळ वितरीत करावा–माजी आमदार धिरज देशमुख यांच्या सूचनेवरून काँग्रेसची उपविभागीय अधिकारी यांच्याकडे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । नदीम पटेल**

अतिवृष्टी व महापुरामुळे सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या नुकसानीबद्दल राज्य सरकारने जाहीर केलेले पॅकेज दिवाळीआधी मराठवाड्यासह राज्यातील शेतकऱ्यांना मिळणार होते. तशी घोषणाही सरकारने केली होती. दिवाळी संपून आठवडा उलटला तरी अद्याप हे पॅकेज बहुतांश शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले नाही. त्यामुळे शेतकरी हताश होवून मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. याची दखल घेवून लातूर ग्रामीणचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार काँग्रेस पदाधिकारी शिष्टमंडळाने लातूरच्या उपविभागीय अधिकारी यांची भेट घेवून यासंबंधी निवेदन दिले असून ऑगस्टपर्यंत २०२५ पर्यंत झालेल्या पिकांच्या नुकसानीबद्दल दसऱ्याआधी शेतकऱ्यांना निधी देणार, असे राज्य सरकारने जाहीर केले होते. पण तीही मदत वेळेत व मुदतीत दिली नाही. सर्व निकष बाजूला ठेवून आम्ही मदत देणार, असे सरकार वारंवार सांगत असले तरी जाचक निकषांमुळे शेतकऱ्यांना मदत वेळेवर मिळत नसल्याचेच दिसून येत आहे. सध्याच्या अडचणीच्या, आपत्तीच्या काळात वेळेवर शेतकऱ्यांना मदत मिळत नसेल तर राज्य सरकार, प्रशासन शेतकरी बांधवांप्रती किती गंभीर आणि किती संवेदनशील आहेत, हे लक्षात



येते. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांपर्यंत प्राधान्याने मदत पोचली पाहिजे, या सोबतच नदीकाठच्या खरडून गेलेल्या जमीनीचे पंचनामे करून त्या संदर्भात देखील योग्य ती कार्यवाही तात्काळ व्हावी. राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या काळात खूप पाऊस आणि पूर झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिके आणि मालमत्ता दोन्ही नष्ट झाली आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला. शेतक-यांना आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. परंतु अद्यापही लातूर तालुक्यातील शिराळा, खंडाळा, हिसोरी, भातखेडा व खुटेफळ तसेच तालुक्यातील इतर गावामध्ये शेतक-यांना नुकसानीच्या अनुदानाची रक्कम जमा झाली झालेली नाही. शेतक-यांनी तातडीने अनुदान वितरीत करणे व नदीकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करणेबाबत विनंती केली आहे. अनुदानाची रक्कम जमा झाली तर नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतक-यांना काहीसा आधार मिळू शकेल.त्यामुळे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुदानाची रक्कम त्वरीत वितरीत करणे आणि नदीकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करणेबाबत महसुल व कृषी विभागास आदेशित करावे असे दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

संपादकीय

# निम्म्या देशाची छाननी

देशातल्या एकूण मतदारांपैकी साधारण निम्म्या मतदारांच्या मतदार याद्यांतील नोंदींची सखोल छाननी निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केली. १२ राज्यांतल्या सुमारे ५१ कोटी मतदारांची छाननी या टप्प्यात होणार आहे. पहिला टप्पा केवळ बिहार राज्याचा झाला (आणि तो बराच गाजला!) निवडणुकीच्या ऐन तोंडावर २४ जून २०२५ रोजी निवडणूक आयोगाने तिथल्या मतदार याद्यांची छाननी जाहीर केली. ऑक्टोबर – नोव्हेंबरदरम्यान तिथे निवडणुका होणार हे आयोगाला माहीत होतं. तरीही त्यांनीही छाननी जाहीर केली आणि स्वतःलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. विरोधक आधीच मतदानाचे वेगवेगळे आकडे मांडून प्रश्न उपस्थित करत होते. 'वोट चोरी'च्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला लक्ष्य करत होते. त्या वातावरणात सगळ्यांचं लक्ष वळवण्यासाठी का होईना, पण आयोगाने घाईघाईने ही छाननी जाहीर केली. त्यासाठीचे निकष, कार्यपद्धतीबाबत अंतिम निर्णय झाले नसताना, मार्गदर्शक कार्यप्रणाली तयार नसताना झालेल्या घोषणेमुळे विरोधकांचं फावलं. त्यांनी आयोगाला जागोजागी खिंडीत पकडलं. मतदाराच्या नोंदणीसाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या कागदपत्रात आधार कार्डाचा समावेश असणार की नाही, हा मुद्दा तर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आयोगाला मान्य करावे लागले. व्यक्तीची नागरिकता मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असू शकतो का? हा प्रश्नही त्या छाननी दरम्यान उपस्थित झाला होता. पालकांच्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या वारसांच्या नोंदी अधिकृत ठरविण्याचा मुद्दाही शेवटी न्यायालयातच पोहोचला. बिहारमध्ये अनाथाश्रमात वाढलेल्या अनेक मुलांनी आयोगाच्या या तरतुदीला आव्हान दिलं. हा मुद्दाच नोंद अधिकृत वा अनधिकृत ठरवण्याच्या यादीत वगळावा, अशी त्यांची मागणी होती. त्याची तड कशी लागली, ते समजलं नाही, त्यामुळे, दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वी आयोगाने पहिल्या टप्प्यात उपस्थित झालेले सर्व प्रश्न आणि त्यावर आयोगाने घेतलेली भूमिका आपल्या वेबसाईटवर सुस्पष्टपणे मांडावी; त्यातून पुन्हा कोणाला नवे प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही, अशी सूचना केली जाते आहे.या टप्प्यासाठी आयोगाने स्वतःला पुरेसा वेळ दिला आहे, ही समाधानाची बाब आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या केंद्रशासित प्रदेशांचा आणि राज्यांचा समावेश आहे, त्यात राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही मोठी राज्यं आहेत. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही विरोधी पक्षांची सरकारं असलेली राज्यं आहेत. या दोन्ही राज्यातले सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे नेते, म्हणजे तिथले मुख्यमंत्री किती आक्रमक आहेत, याची कल्पना पूर्ण देशाला आहे. बिहारच्या छाननीवेळी विरोधकांनी काही विशिष्ट मतदारांची नांवं यादीतून घाऊकरीत्या वगळली जात आहेत, असा आरोप केला होता. पण, छाननी होऊन निवडणुका घोषित झाल्या, तरी त्या तक्रारीचा कोणी पुनरुच्चार केलेला दिसत नाही. तो आरोप किती पोकळ होता, हे यावरून लक्षात येतं. आता तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनीही 'श्रमिक, अनुसूचित जाती, अल्पसंख्याक आणि महिलांची नावं या छाननीच्या माध्यमातून कमी करण्याचा डाव आहे', असा आरोप केला आहे. पश्चिम बंगालमध्ये घुसखोरीचा मुद्दा खूपच संवेदनशील आहे. या छाननीच्या निमित्ताने घुसखोरांची घाऊक प्रमाणात नांवं घुसवली जातील किंवा नको असलेल्या जनसमूहांची नांवं वगळली जातील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाची या दोन्ही राज्यात कसोटी आहे. सर्व पक्षांचा विश्वास प्राप्त करणं आणि सर्वांच्या सहकार्याने देशभर ही छाननी प्रक्रिया पूर्ण करणं हे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुढचं आव्हान असणार आहे ते या अर्थानेच.सशक्त लोकशाहीसाठी निवडणूक याद्यांची छाननी आवश्यकच आहे. त्यात कुणाचंच दुमत नाही. अशी नियमित छाननी साधारण पाच वर्षांतून एकदा होतही असते. पण, त्यात बऱ्याच त्रुटी राहतात, हे सर्वमान्य आहे. या त्रुटी मुख्यतः गटपातळीवरील अधिकाऱ्यांकडून, माहिती संकलकांकडून राहतात. या साध्या छाननीत चुका राहिल्यास संबंधित संकलकाला जालीम शिक्षा होत नाही. त्यामुळे, ही छाननी पुरेशा गांभीर्याने घेतली जात नाही. अनेक मृत व्यक्तींची नांवं यादीत तशीच राहतात; तर नवीन नांवं आवर्जून नोंदवली जात नाहीत. या छाननीमध्ये होणारे घोळ आणि निवडणुकीआधी मतदान यादीतील नांवे वगळण्याची किंवा जोडण्याची जी प्रक्रिया होते, ती पूर्ण विश्वासार्ह नाही. त्यात त्रुटी राहतात आणि त्यामुळेच सखोल छाननीची गरज पडते. सध्या सुरू असलेली सखोल छाननी तब्बल २१ वर्षांनी होते आहे. हेही योग्य नाही. ठरावीक काळाच्या अंतराने मतदार याद्यांची सखोल छाननी झाली पाहिजे. मतदानातले गैरप्रकार टाळले पाहिजेत. सर्वसामान्य माणसाचा लोकशाही राज्यव्यवस्थेवरील विश्वास वाढण्यासाठी हे फार महत्त्वाचं आहे. मतदारयाद्यांची सखोल छाननी करताना आपल्या देशातील एकूण समाजरचना, राज्यनिहाय चालीरीती, परंपरांचा विचारही केला पाहिजे. महिला मतदारांची नोंद करण्यासाठी प्रमाण म्हणून जी कागदपत्रं सांगितली आहेत, ती बऱ्याच राज्यात महिलांकडे असण्याची शक्यता नाही. महिलांचं शिक्षण किंवा त्यांना नागरिक म्हणून असलेले अधिकार आपल्याकडे गांभीर्याने घेतले जात नाहीत. ती 'लाभार्थी' होण्याची शक्यता असेल आणि संपूर्ण कुटुंबाला त्याचा लाभ होणार असेल, तरच महिलांची कागदपत्रं अद्ययावत केली जातात. अन्यथा, महिलाही त्याबाबत जागरूक नसतात. या शतकात जगात आणि देशातही स्थलांतराची गरज प्रचंड वाढली आहे. हे स्थलांतर मुख्यतः बिकट जगण्याकडून सोप्या जगण्याकडे होत असतं. जे जगणं अवघड म्हणूनच परागंदा होतात, त्यांच्याकडे सगळी अचूक कागदपत्रं असण्याची शक्यता नसते. भटके – विमुक्त, अशिक्षित कुटुंबांचा यादृष्टीने विचार केला पाहिजे. जनगणनेचे आकडे आणि मतदार नोंदणीचे आकडे परस्परांशी कधीच का जुळत नाहीत? याचा विचारही नियोजनाच्या वरिष्ठ पातळीवर झाला पाहिजे. यातली तफावत निघून जाईल, अशी कार्यप्रणाली स्वीकारली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. जे विरोधक मतदार याद्यांत गडबड आहे, म्हणून देशभर टाकू फोडताहेत, तेच मतदार याद्यांच्या सखोल छाननीला आणि दुरुस्तीला विरोध करताना दिसताहेत, यासारखा दुसरा विनोद नसेल!! मतदारांनीच त्यांना आता याबाबत जाब विचारला पाहिजे.

# पदवीधर मतदारसंघासाठी भाजपने कंबर कसली

स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत आता पुणे पदवीधर निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून, पुणे पदवीधर निवडणुकीसाठी आतापासूनच इच्छुकांची भाऊगर्दी पाहायला मिळत आहे. मागील निवडणुकीत महाविकास आघाडीकडून झालेला पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागल्याने ही उणीव भरून काढण्यासाठी यंदा पक्षाने चांगलीच कंबर कसली आहे.





पुणे विभाग पदवीधर मतदारसंघ (महाराष्ट्र विधान परिषदेचा पदवीधर मतदारसंघ) या आगामी निवडणुकीसंदर्भात विविध राजकीय पक्षांची ताकद, संभाव्य रणनिती, मुद्दे आणि परिस्थिती यावर लक्ष केंद्रित करणारी असणार आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे देखील या मतदारसंघांचा भाग आहे. म्हणून हे मतदारसंघ केवळ पुणे शहरापुरते मर्यादित नाहीत, तर आसपासच्या जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. मागील निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतून अरुण लाड यांना उमेदवारी मिळाली. त्यांच्याविरोधात भाजपचे संग्रामसिंह देशमुख, मनसेच्या रूपाली पाटील, जनता दलाचे शरद पाटील, अपक्ष डॉ. श्रीमंत कोकाटे, बहुजन आघाडी सोमनाथ साळुंखे असे उमेदवार होते. मात्र, खरी लढत महाविकास आघाडी व भाजपमध्ये झाली.एकूण झालेल्या मतांपैकी २ लाख २८ हजार २५९ मते वैध ठरली, तर तब्बल १९ हजार ४२८ मते अवैध ठरली. विजयासाठी १ लाख १४ हजार १३१ कोटा निश्चित करण्यात आला होता. महाविकास आघाडीचे उमेदवार अरुण लाड यांनी पहिल्याच फेरीत १ लाख २२ हजारांहून अधिक मते घेत एकहाती विजय मिळवला होता. त्यांचे विरोधक भाजपचे उमेदवार संग्रामसिंह देशमुख यांना केवळ ७३ हजार एवढी मते मिळाली. लाड यांचा ४८ हजार ८२४ मतांनी विजय झाला. भाजपकडून शरद लाड हे इच्छुक आहेत. तर दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे आणि जनसुराज्य पक्षातर्फे अनेकजण इच्छुक आहेत. या पक्षांकडून नव्याने मतदार नोंदणीचा धडाका सुरू झाला आहे. प्रत्येक पक्षाचे गटनेते पदवीधरांची मत नोंदणी अधिक कशी होईल, याकडे लक्ष देत आहेत. आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लक्षात घेऊन भाजपमध्ये प्रवेश केला आहे. आता त्यांना भाजपमधून उमेदवारी मिळते का, याबद्दल औत्सुक्य आहे. आमदार लाड यांच्या जागी महाविकास आघाडीसाठी सध्या तरी शिक्षकेतर संघटनेचे शिवाजीराव खांडेकर हे दावेदार मानले जात आहेत. पुणे पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने समीकरणे बदलली असून, भाजपमधील इच्छुकांना चाप बसला आहे. मात्र, महाविकास आघाडीकडे उमेदवारीसाठी इच्छुकांना मोर्चेबांधणी सुरू केली आहे. आमदार जयंत पाटील यांचे स्नेही व माजी खासदार एस. डी. पाटील यांचे नातू ॲड. धैर्यशील पाटील निवडणुकीसाठी रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. ते शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य होते. मंत्री हसन मुश्रीफ यांचे निवांत समर्थक प्रताप माने हे या निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. राष्ट्रवादीलाच जागा मिळावी, यासाठी येथील नेतेमंडळी अग्रेसर आहेत. जनसुराज्यचे सुमित कदम यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मनसेकडूनही काहीजण इच्छुक आहेत. उमेदवारी मिळाली नाही, तर काहीजण अपक्षही लढण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे ही निवडणूक आतापासूनच रंगत असल्याचे दिसून येत आहे. मतदार यादीमध्ये बदल होणार असून, नवीन मतदारांची भर, ऑनलाइन नोंदणी, नाव व मतदारशक्तीचा विस्तार हे आगामी निवडणुकीचे महत्त्वाचे मानले जात आहे. पदवीधर मतदारसंघ असल्याने 'शिक्षण', 'उद्योग-नोकरी', 'उच्चशिक्षण सुविधा' यांचा चर्चेचा विषय होण्याची शक्यता जास्त आहे.

पक्षांनी उमेदवारीची घोषणा, प्रवासी अभियाने, मतदारांसमोर समोरासमोर भेटी यांच्या माध्यमातून तयारी करण्यात येणार आहे. मुख्य पक्षांमध्ये स्पर्धा वाढल्यास तिसऱ्या घटकांचा प्रभाव वाढू शकतो; उदा. विभाजित मत, मतदान कमी होणे, गुप्त वळण इत्यादी गोष्टी घडू शकतात. विद्यापीठ पदवीधर मतदारसंघात मतदार सक्रिय करण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. पूर्वी मतदार यादीतील चुकीचे ठिकाण, ओळखपत्रातील चुका या निवडणुकीमध्ये अडथळा ठरल्या होत्या. पक्षांनी उमेदवारी, आंतरिक मतभेद, गठबंधन यावर नियंत्रण ठेवले पाहिजे अन्यथा तो नकारात्मक परिणाम देऊ शकतो, अशी आव्हाने समोर असणार आहेत. स्थापित पक्ष म्हणून, अनुभव आणि गतकालीन विजय यांचा आधार घेत पुढे महाविकास आघाडी पुढे जाण्याची शक्यता आहे. भाजप पूर्वी हे पदवीधर मतदारसंघ त्यांचे म्हणत असत; परंतु पुनरागमन करण्यासाठी त्यांच्यामध्ये कटिबद्धता असावी लागेल. या भाजप आणि महाविकास आघाडीमध्ये मुख्य निवडणूक होणार असली तरी अन्य पक्षातील उमेदवार मुख्य पक्षांमध्ये मत विभाजानसाठी शक्यता निर्माण करू शकतात. पुणे विभाग पदवीधर हे मतदारसंघ राजकीय दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. स्थापित पक्षांची ताकद, विरोधकांची चढाओढ, मतदार यादीतील बदल आणि प्रचार यांचा संगम याच्या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त करून देतो. पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांची मतदार यादी नव्याने तयार करण्याच्या कार्यक्रमाअंतर्गत भारत सरकार आयोगाकडून विभागातील पात्र मतदारांनी संकेतस्थळावर ६ नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खोट्या तक्रारदारांवर कारवाई होणार का?

विशाखा समितीने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी तपास सुरू केला. ही समिती तक्रारींची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करते, ज्यामध्ये पुरावे गोळा करणे आणि साक्षीदारांच्या मुलाखती घेणे समाविष्ट असते. ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काम करते. विशाखा समितीने चौकशी केलेल्या जिल्हा परिषदेतील तीनपैकी दोन अधिकाऱ्यांना यापूर्वीच क्लीन चीट दिली आहे, तर सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांचीही निनावी तक्रार असल्यामुळे चौकशी करण्याची गरज नसल्याची विशाखा समितीने राज्य सरकारला दिलेल्या अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे या तिनही अधिकाऱ्यांविरोधात आता खोटी तक्रार करणाऱ्यांना किंवा त्यांना पाठबळ देणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासनाला आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेचे सीईओ काय कारवाई करणार याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.




शासकीय कार्यालयात लैंगिक छळाच्या तक्रारी स्वीकारणे, त्यांची चौकशी करणे आणि योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार राज्य शासनाने विशाखा समितीकडे दिले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरण सुनिश्चित करणे. 'लैंगिक छळ' म्हणजे काय, याबद्दलची माहिती सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत समितीमार्फत पोहोचवली जाते. समितीमध्ये किमान अर्ध्या सदस्या महिला असणे अनिवार्य तसेच समितीचे नेतृत्व महिला सदस्यानेच करणे आवश्यक आहे. ही समिती तक्रारींची चौकशी करते, महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करते आणि वार्षिक अहवाल सादर करते. त्या अहवालानुसार शासन पुढे योग्य ती कार्यवाही करत असते. काही महिन्यांपूर्वी नाशिक जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सुधाकर मोरे यांच्या विरोधात विशाखा समितीकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यात समितीने चौकशी केल्यानंतर प्रारंभी डॉ. सुधाकर मोरे आणि त्यानंतर काही दिवसांपूर्वीच प्रताप पाटील यांनाच क्लीन चीट दिली. प्रारंभी डॉ. मोरे आणि त्यानंतर पाटील यांनी आपले नियमित कामकाज सुरू देखील केले. समितीने परदेशी यांच्या चौकशीचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यात परदेशी यांच्याबाबत निनावी तक्रारी आल्यामुळे त्यांच्या चौकशीची गरज नसल्याचे त्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे निनावी तक्रारीची दखल घेऊ नये असे शासनाकडून स्पष्टपणे नमूद केल्यानंतरही समितीच्या कामकाजावरच खऱ्या अर्थाने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांच्या करिअरचे काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे परदेशी यांच्याबाबत तर हे सर्व प्रकरण घडवून आणले गेल्याचे बोलले जात आहे. कर्तव्य दक्ष अधिकाऱ्यांवर निनावी तक्रार, मिडिया ट्रायल करण्यामागे नेमके कोण आहे? हे शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची खरी गरज आहे. अन्यथा पुढील काळात जिल्हा परिषदेच काय तर अन्य शासकीय कार्यालयात देखील असे प्रकार वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांमध्ये किंवा अधिकारी अन् कर्मचाऱ्यांमध्ये कामकाजाहून वाद निर्माण होऊ शकतात; परंतु हे वाद वैचारिक अर्थात केवळ उत्तम कामकाजासाठी असतात. हे वाद विशाखा समिती किंवा शासनापर्यंत जाऊ नये याची दोन्ही बाजूने खबरदारी घेण्याची खरी गरज आहे. विशाखा समितीकडे निनावी तक्रार करण्यामागे स्वतःची ओळख लपवणे हा जरी हेतू असला तरी आपल्या हक्काचा दुरुपयोग झाल्याचे या प्रकरणातून प्रथम दर्शनी दिसते. तक्रारदार महिलांना महिला हक्क आयोग हा देखील पर्याय उपलब्ध होता. जिल्हा परिषदेतील अंतर्गत राजकारण, वर्चस्ववाद, कुरघोडी आणि विशिष्ट खुर्चीसाठी सुरू असलेली लॉबिंग, काही दुखावलेल्या संघटना ही प्रमुख कारणे देखील या प्रकरणामागे समोर येत आहे; परंतु आता जिल्हा परिषदेत विश्वासार्हता निर्माण होण्यासाठी प्रमुख असलेल्या मुख्य अधिकारी कार्यकारी यांनी आपले दालन विभागप्रमुखापासून ते सर्वसामान्य कर्मचाऱ्यांपर्यंत खुले ठेवण्याची गरज आहे. जिल्हापरिषद प्रमुखांशी ते थेट कोणत्याही अडचणी किंवा विषयावर बोलू शकतात. पुढील काळात तरी असे प्रकार होऊ नये यासाठी शासनाने तरी दक्षता घ्यावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या.मिनी मंत्रालयात एक प्रकारे षडयंत्रच यापूर्वी जिल्हा परिषदेत इतर अनेक कारणांनी अधिकारी वादात सापडले होते. परंतु मिनी मंत्रालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच तिघा विभाग प्रमुखांविरोधात तक्रारी येण्याची पहिलीच वेळ आहे. विशाखा समितीची पुनर्रचना केल्यानंतर दोन दिवसात पहिली तक्रार प्राप्त झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. वर्ग एकच्या चौकशी समितीत विभागीय आयुक्त असणे आवश्यक असल्याचा शासन निर्णय आहे. समितीत बाहेरच्या सदस्यांचा समावेश करणे बंधनकारक आहे. मात्र एकही सदस्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. समितीच्या अध्यक्षपदी वरिष्ठ ऐवजी कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली, त्यामुळे ही समिती वादात सापडल्याची चर्चा होती. तिघांपैकी एकही अधिकाऱ्यांविरोधात आरोप सिद्ध न झाल्यामुळे हे एक प्रकारे षडयंत्रच असल्याचे बोलले जात आहे. दोघे अधिकारी त्यांच्या पदावर रुजू झाले आहेत. तसेच तत्कालीन सी. इ. ओ. असताना तक्रारी यायच्या, परंतु नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी आल्यापासून एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. दरम्यान, एका पेन ड्राईव्हची देखील चर्चा देखील आजतागयात जिल्हा परिषद वर्तुळात रंगत आहेत. त्यात नेमकेकी काय होते याबाबत सर्वांनाच प्रश्न निर्माण झाला आहेत.

# चॉकलेटप्रेमींना माहितचं नसेल चॉकलेटबाबतच्या 'या' १० रंजक गोष्टी

चॉकलेट ही अशी गोष्ट आहे जी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडते. चॉकलेटचे अनेक प्रकार आपल्याला बाजारात पाहायला मिळतात. जसे की क्रिमी टेक्सचर, कुरकुरीत टच आणि नट्ससह चॉकलेट. तर आपल्यापैकी अनेकांना मिल्क चॉकलेट खायला आवडते तर काहींना डार्क चॉकलेट खायला आवडते. त्याचबरोबर आजकाल कस्टमाइज्ड चॉकलेट देखील उपलब्ध आहेत जे फुलांपासून ते अनेक डिझाइनमध्ये उपलब्ध आहेत. जर तुम्ही देखील चॉकलेट प्रेमी असाल तर तुम्हाला चॉकलेट संबंधित काही तथ्ये माहित असणे आवश्यक आहे जे खूप मनोरंजक आहेत.चॉकलेटचे सेवन हे आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, कारण त्यात भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे जे फिटनेस प्रेमी आहेत ती लोकं डार्क चॉकलेटला पहिले प्राधान्य देतात. बहुतेक लोकं चॉकलेटचे ब्रँड आणि प्रकारांशी परिचित असतात, परंतु त्याच्या उत्पत्तीबद्दल अनेक मनोरंजक तथ्ये आहेत जी फार कमी लोकांना माहिती आहेत. तर आजच्या लेखात आपण चॉकलेटबाबतच्या १० रंजक गोष्टींबद्दल जाणून घेऊयात.



**चॉकलेट बद्दल मनोरंजक तथ्ये**

१. आपल्या देशात चॉकलेट प्रेमींची कमतरता नाही, पण तुम्हाला माहिती आहे का की ब्रिटीश राजवटीत चॉकलेट भारतात आले. पहिल्यांदाच तमिळनाडूच्या कोर्टलममध्ये कोकोची लागवड सुरू झाली.

२. चॉकलेट हे कोको बीन्सपासून बनवले जाते, त्याचे तीन प्रकार आहेत, क्रिओलो, फोरास्टेरो, ट्रिनिटारियो.

३. स्वित्झर्लंड हा असा देश आहे जे सर्वात जास्त चॉकलेटचा वापर करतो. त्यानंतर जर्मनी, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड आणि बेल्जियम सारखे देश देखील मोठ्या प्रमाणात चॉकलेट वापर करतात.

४. शुगरफ्री चॉकलेट खाणे फायदेशीर असते आणि त्याच बरोबर या चॉकलेटचा सुगंध तणाव कमी करण्यास आणि मूड सुधारण्यास देखील मदत करू शकता

५. चॉकलेटचा उगम प्राचीन मेसोअमेरिकन संस्कृतींशी संबंधित असल्याचे मानले जाते.

६. आजच्या काळात चॉकलेट अनेक फ्लेवर्समध्ये बनवले जातात, परंतु पहिल्यांदा जेव्हा चॉकलेटचा शोध लागला तेव्हा ते पेय म्हणून वापरले गेले.

७. दुसऱ्या महायुद्धादरम्यान सैनिकांच्या ऊर्जा मिळावी यासाठी त्यांचा आहारात किंवा रेशनमध्ये चॉकलेटचा समावेश केला गेला होता. कारण चॉकलेट हे शरीरात ऊर्जा निर्माण करते.

८. मिल्क चॉकलेट हा देखील लोकप्रिय पर्याय आहे. त्याचे उत्पादन १८७५ मध्ये कोएनराड जोहान्स व्हॅन हौटेन यांनी सुरू केले होते.

९. ब्रिटनमधील पहिला चॉकलेट कारखाना १८४७ मध्ये जे.एस. फ्राय अँड सन्सने उघडला होता, परंतु चॉकलेटची विक्री १८४२ मध्ये सुरू झाली होती.

१०. चॉकलेटच्या शोधाबद्दल काही मनोरंजक तथ्ये आहेत. त्याचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीचा असल्याचे मानले जाते आणि प्राचीन संस्कृतींना ते वेगवेगळ्या प्रकारे माहित होते. जसे की अझ्टेक लोकं चलन म्हणून कोको बीन्स वापरत असत, मायन लोकं ते कोको बीन्सला देवांचे अन्न म्हणत असत आणि ओल्मेक्स लोकं कोको बीन्सपासून पेय बनवत असत.

# गोसेखुर्द उजवा कालव्याच्या पाणी प्रश्नावरून विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार ॲक्शन मोडवर

## सत्ता पक्षातील नेत्याचा कंत्राटात सहभाग; वर्षभरात कॅनलचे केवळ १० टक्के काम

### परिसरातील हजारो शेतकरी पाणी पुरवठ्याच्या प्रतीक्षेत; रब्बी पिक व उन्हाळी धानाला पाणी न मिळाल्यास मोठे जनआंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

गेल्या वर्ष भरापासून गोसेखुर्द प्रकल्पाच्या उजव्या कालव्याच्या आरबीसी कॅनलचे काम अतिशय संथ गतीने होत असल्याने १५ हजार हेक्टर शेतीला याचा फटका बसत असून शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. आज ब्रम्हपुरी तालुक्यातील व परिसरातील रब्बी हंगामातील शेती तसेच उन्हाळी धान शेतपिकांना पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावरून विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी आक्रमक पवित्रा घेऊन गोसेखुर्द उजवा कालवा विभाग ब्रम्हपुरी कार्यालयाला नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सोबत धडक देत शेतकऱ्यांच्या रास्त मागणीला न्याय देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावेळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून सत्ता पक्षातील नेत्याचा कंत्राटात सहभाग असल्याने कालव्याचे काम संथ गतीने सुरू असून यावर १५ दिवसाच्या आत शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध न केल्यास मुख्य अभियंता कार्यालयाला घेराव घालणार सोबतच शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी मोठे जनआंदोलन उभारणार असा सज्जड इशारा यावेळी विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी दिला.

विदर्भातील सर्वात मोठा जल प्रकल्प म्हणून गोसेखुर्द प्रकल्प प्रसिद्ध आहे. या प्रकल्पाची मुहूर्तमेढ करतांना तसेच विदर्भातील शेती ओलिताखाली यावी याकरिता काँग्रेस सत्ताकाळात राज्यमंत्री असतांना विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार यांनी आपल्या अथक प्रयत्नातून तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे कार्यकाळात गोसेखुर्द प्रकल्पाकरिता ५ हजार कोटींचा विकास निधी मिळवून दिला. याचा फायदा आज विदर्भातील अनेक जिल्ह्याच्या शेतकऱ्यांना होत असून लाखो हेक्टर शेतीला मुबलक पाणी मिळत आहे. याच प्रकल्पा अंतर्गत उजव्या कालव्यातून लगतच्या परिसरातील शेतीला रब्बी पिक तसेच उन्हाळी धान शेतपिकांना पाणी उपलब्ध व्हावे.या हेतूने विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी आपल्या अथक प्रयत्नातून आरसीबी कॅनल कामाला मंजुरी मिळवून दिली.



मात्र मागील वर्षीपासून गोसेखुर्द उजव्या कालव्याच्या आरसीबी कॅनलचे (ऑक्टोबर २०२४ मधे कार्यारंभ आदेश, अंदाजित किंमत २५० कोटी) काम थंडबस्त्यात आहे. यात कंत्राटदारांनी केवळ १० टक्के काम करून शेतकऱ्यांच्या पल्लवीत झालेल्या आशेवर पूर्णतः पाणी फेरण्याचे काम केले.ब्रम्हपुरी तालुक्यातील तसेच उजवा कालवा शेती पाणीपुरवठा लाभार्थी शेतकऱ्यांना न्याय आज विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी गोसेखुर्द प्रकल्प उजवा कालवा कार्यालय ब्रम्हपुरी येथे शेतकऱ्यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावत आरसीबी कालव्याच्या प्रश्नावरून त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. यावर अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर कामाचे कंत्राट सर्ला व खडतकर या कंपनी कडे असून सत्ता पक्षातील नेत्याचा कंत्राटात सहभाग असल्याने कामात दिरंगाई व अडथळा निर्माण होत असल्याचे दिसून आले. यावर विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी थेट मुख्य अभियंता गवळी यांना फोनवरून संवाद साधत येत्या १५ दिवसाच्या आत शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी न मिळाल्यास कार्यालयाला घेराव घालणार तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठे जनआंदोलन उभारणार असा सज्जड इशारा दिला. यावर सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना लवकरच शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येईल असे मुख्य अभियंता गवळी म्हणाले. यानंतर शेतकऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन उपस्थित कार्यकारी अभियंता संदीप हासे यांचेकडे सुपूर्द केले. या प्रसंगी प्रामुख्याने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रा. देविदास जगनाडे, काँग्रेस तालुका अध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जिल्हा परिषद सभापती डॉ.राजेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर, माजी नगरसेवक डॉ.नितीन उराडे, काँग्रेस व युवक काँग्रेस पदाधिकारी, तसेच मोठ्या संख्येने ब्रम्हपुरी तालुका व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्ता योजनेचे निकष ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेलाही लागू करावेत–प्रा.रामदास झोळ

सह्याद्रीचा राखणदार
**सोलापूर | प्रतिनिधी**

ओबीसी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या हेतूने दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन एक महत्त्वपूर्ण मागणी केली.

प्रा. झोळ यांनी यावेळी सांगितले की, सध्या डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना खुला प्रवर्ग, एसईबीसी आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शहरी तसेच ग्रामीण भागात लागू आहे. या योजनेसाठी उत्पन्न मर्यादा आठ लाख रुपये असून, महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येतो.



मात्र ओबीसी, विमुक्त जाती–भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना लागू आहे. ही योजना केवळ शहरी भागापुरती मर्यादित असून, उत्पन्न मर्यादा फक्त दोन लाख पन्नास हजार रुपये इतकी आहे. त्यातही प्रति जिल्हा केवळ ६०० विद्यार्थ्यांपर्यंतच मर्यादा ठेवण्यात आली आहे आणि अर्ज प्रक्रिया अद्याप ऑफलाइन पद्धतीनेच सुरू आहे.

या दोन्ही योजनांमधील तफावत लक्षात घेता, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना ही डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्ता योजनेप्रमाणेच शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागातील विद्यार्थ्यांना लागू करावी, तसेच तिची अर्ज प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन स्वरूपात सुरू करावी, अशी मागणी प्रा. झोळ यांनी केली.

या मागणीबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, हा विषय पुढील समितीच्या बैठकीत मांडून आवश्यक निर्णय घेण्यात येईल,असे आश्वासन दिले.

# विभागीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत २५६ खेळाडूंचा सहभाग

### चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकूल येथील वातानुकूलीत हॉलमध्ये आयोजन

सह्याद्रीचा राखणदार
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

नागपूर विभागीय शालेय बॅडमिंटन क्रीडा स्पर्धांचे आयोजन ३० व ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वातानुकूलित बॅडमिंटन हॉल येथे करण्यात आले. यात नागपूर विभागातील नागपूर ग्रामीण, नागपूर महानगरपालिका क्षेत्र, चंद्रपूर ग्रामीण, चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्र, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा जिल्ह्यातून १२८ मुले व १२८ मुली असे एकूण २५६ खेळाडू मुला–मुलींनी सहभाग नोंदविला.

युवक सेवा संचालनालय, पूणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पूंड, जिल्हा



माहिती अधिकारी राजेश येसनकर यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी, चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वातानुकूलीत बॅडमिंटन हॉलमध्ये राज्य, राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू निर्माण होत असून त्याचा लाभ जिल्ह्यातील खेळाडू मोठ्या प्रमाणावर घेत आहे, असे सांगितले.कार्यक्रमाचे संचालन क्रीडा अधिकारी तथा स्पर्धा प्रमुख मनोज पंधराम यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्याकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी व जिल्हा क्रीडा संकुल समिति चंद्रपूरच्या कर्मचा–यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी मोठया प्रमाणात खेळाडू व नागरिक उपस्थित होते.

# उस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्यायासाठी शिवसेनेचा इशारा–१७ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता | **अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खाजगी व सहकारी साखर कारखान्यांना थेट इशारा देण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या बैठकीत सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी व अन्यायग्रस्त शेतकरी उपस्थित होते. बैठकीत साखर कारखानदारांच्या मनमानी, उस दर न जाहीर करणे, वजन काट्यातील गैरप्रकार आणि ऊस वाहतूक व्यवस्थेतील धोकादायक प्रकार या सर्व मुद्द्यांवरून शेतकऱ्यांनी संतप्त नाराजी व्यक्त केली.

बैठकीत चर्चेदरम्यान हे स्पष्ट झाले की, राज्यातील आणि जिल्ह्यातील बहुतेक साखर कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३५५० रुपये प्रति टन हा केंद्र सरकारने सुचवलेला दर देण्यास टाळाटाळ करीत आहेत.कारखान्यांचे चेअरमन किंवा एमडी स्वतः बैठकीस उपस्थित राहत नाहीत, त्याऐवजी निर्णय घेऊ न शकणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पाठवले जाते, अशी टीका शेतकरी प्रतिनिधींनी केली. साखर कारखान्यांकडून उसाच्या वजनात मोठ्या प्रमाणावर काटामारी होत असल्याचे गंभीर आरोप करण्यात आले.शेतकऱ्यांना आपला ऊस बाहेरील खाजगी काट्यावर वजन करून खात्री करण्यास कारखाने मनाई करतात, ज्यामुळे वजनात मोठी फसवणूक होत असल्याचे उघड झाले. तसेच, अनेक साखर कारखाने आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस दुर्लक्षित करून जिल्ह्याबाहेरील ऊस आणतात आणि त्याचा वाहतूक खर्च स्थानिक शेतकऱ्यांच्या माथी मारतात, ज्याचा थेट फटका दरावर बसतो. ऋझ नुसार देयके न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई नाही – शेतकऱ्यांची खंत उस नियंत्रण आदेश १९६६ च्या तरतुदीनुसार पंधरा दिवसांच्या आत ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने आजपर्यंत थकीत बिलाची देयके शेतकऱ्यांना दिलेली नाहीत, तसेच त्यावर व्याजही दिलेले नाही. शेतकऱ्यांच्या वारंवार तक्रारी असूनही साखर आयुक्त आणि प्रादेशिक साखर सहसंचालकांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, अशी खंत शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केली. कुकडी सहकारी साखर कारखान्याने जाहीरनाम्यात प्रति टन २९११ रुपये दर दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली असल्याचे स्पष्ट करण्यात आले. याबाबत साखर आयुक्तांकडे तक्रार देऊनही आजवर कोणताही खुलासा झालेला नाही. साखर कारखान्यांच्या ऊस वाहतूक यंत्रणेकडून ओव्हरलोड व मॉडिफाइड वाहने रस्त्यावर धावत असल्यामुळे दरवर्षी शेकडो अपघात होऊन निष्पाप नागरिकांचे प्राण जात आहेत. या धोकादायक ऊस वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात परिवहन व पोलिस विभाग अपयशी ठरले आहेत, असा आरोप बैठकीत करण्यात आला. गेल्या २० वर्षांपासून ऊस वाहतुकीचा दर वाढवण्यात आलेला नसल्याने वाहतूकदार ओव्हरलोड वाहतूक करण्यास भाग पडतात. परिणामी अपघातांची संख्या वाढत आहे.तसेच ऊस तोडीसाठी ठेकेदार शेतकऱ्यांकडून अवैधरित्या प्रति एकर १० ते १५ हजार रुपये आणि वाहन ड्रायव्हरकडून अतिरिक्त शुल्क आकारतात, हेही गंभीर गैरप्रकार थांबवण्याची मागणी करण्यात आली अन्यथा १७ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम आंदोलनाचा इशारा शिवसेना शिंदे गटाचे तथा सामाजिक कार्यकर्ते अभिजीत पोटे करणार असल्याचे सांगितले तसेच जर १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले व्याजासह जमा केली नाहीत आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रति टन ३५५० रुपये भाव जाहीर करावा व कुकडी साखर कारखान्याने थकीत असणारे शेतकऱ्यांचे ७११ रुपये प्रति टन पेमेंट द्यावे अन्यथा १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आम्ही हजारो ऊस उत्पादक शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालय व आरजेडी कार्यालयावर मुक्काम आंदोलन करणार असून यामध्ये शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, शेतकरी प्रतिनिधी आणि अन्यायग्रस्त ऊस उत्पादक शेतकरी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती अभिजीत पोटे यांनी दिली यावेळी साखर संघाच्या मिटींगला कृष्णा सातपुते, संजय वाघ, महादेवजी आव्हाड, बाळासाहेब कदम, सोमनाथ गरजे, बाळासाहेब कराळे, प्रशांत कराळे, शरद वाळुंज, युसुफ पठाण, बाळासाहेब पेरणे, रोहन साळवे, सचिन तांबे, चावरे आदी सह कुकडी कारखान्याचे थकलेले पेमेंट असणारे असंख्य शेतकरी तसेच शिवसैनिक उपस्थित होते

# भारताच्या रणरागिणींचा वुमेन्स वर्ल्डकप स्पर्धेत ऐतिहासिक विजय!

## ऑस्ट्रेलियाची नांगी ठेचून फायनलमध्ये धडक

### अंतिम फेरीत भारत दक्षिण आफ्रिका सोबत भिडणार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

वुमन्स वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत आणि ऑस्ट्रेलिया हे संघ आमनेसामने आले होते. ऑस्ट्रेलियाने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने ४९.५ षटकात सर्व गडी गमवून ३३८ धावा केल्या आणि विजयासाठी ३३९ धावांचं आव्हान दिलं. खरं तर हे आव्हान खूपच मोठं होतं.

विजयासाठी ३३९ धावांचं आव्हान दिलं. खरं तर हे आव्हान खूपच मोठं होतं. अनेकांनी तर विजयाच्या आशाच सोडून दिल्या होत्या. त्यात शफाली वर्मा आणि स्मृती मंधाना स्वस्तात बाद झाल्यानंतर हा सामना हातून गेला असंच वाटत होतं. पण जेमिमा रॉड्रिग्स आणि कर्णधार हरमनप्रीत



कौर यांनी झुंजार खेळी करत १६७ धावांची भागीदारी केली. या भागीदारीच्या जोरावर टीम इंडियाच्या विजयाचा पाया रचला गेला. जेमिमा रॉड्रिग्सने १३४ चेंडूत नाबाद १२७ धावा केल्या. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ८९ धावांची खेळी केली. एक वेळ धावा आणि चेंडूंचं अंतर खूप जास्त होतं. पण दीप्ती शर्मा आणि ऋचा घोष यांनी आक्रमक फटकेबाजी करत हे अंतर कमी केलं. भारताने हा सामना ५ विकेट आणि ९ चेंडू राखून जिंकला.

आता पहिल्यांदाच वर्ल्डकप न जिंकणारे दोन संघ अंतिम फेरीत पोहोचले आहेत. भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात अंतिम फेरीचा सामना होणार आहे. हा सामना २ नोव्हेंबरला होईल. या सामन्यात क्रिकेटविश्वाला नवा विजेता मिळणार हे नक्की झालं आहे.

## शासनाच्या नमो टुरिझम सेंटरला राज ठाकरेंचा विरोध

# मला मुख्यमंत्री करा म्हणून किती लाचारी करायची? ;शिंदेवर खोचक टीका

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मुंबईतील मेळाव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना संबोधित केलं. यावेळी राज ठाकरे यांनी ईव्हीएमच्या माध्यमातून कशाप्रकारे मतचोरी केली जाते आणि घोटाळा कसा होतो याची प्रात्याक्षिक दाखवले. तसेच मतदार याद्यांमधील घोळ दूर करण्याच्या मागणीसाठी पुकारलेल्या १ नोव्हेंबरच्या मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावं, असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं. राज ठाकरे यांनी यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही सडकून टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस निमित्ताने राज्य सरकारकडून शिवरायांच्या गड किल्ल्यांवर नमो टुरिझन सेंटर उभारले जाणार आहेत. त्याला राज ठाकरे यांनी कठोर शब्दांत विरोध करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सडकून टीका केली.आपण आपला स्वाभिमान किती



गहाण टाकायचा याला काही मर्यादा आहे की नाही. आजच्या वृत्तपत्रांमध्ये बातम्या आहेत. जीआर सुद्धा आला आहे. हे एकनाथ शिंदे यांचं खातं आहे. काय करत आहेत हे ऐकाल तर नाही तुमची तळपायाची आग मस्तकात गेली तर सांगाल, असं राज ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले.नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पर्यटन विभाग महाराष्ट्रात पर्यटनाचे स्पॉट काढत आहेत. त्या केंद्रांची नावे नमो टुरिझम सेंटर्स देण्यात आली आहेत. हे नमो टुरिझम सेंटर्स कुठे काढत आहेत तर शिवनेरीवर, रायगडावर, राजगडावर... जिथे फक्त आमच्या महाराजांचं नाव असलं पाहिजे तिथे हे टुरिजम सेंटर काढायला निघाले आहेत. मी आता सांगतोय. सत्ता असो नसो. वर नाही, खाली नाही, आजूबाजूला असो, कुठेही नाही. उभं केलं की फोडून टाकणार, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.मला स्वत:ला मुख्यमंत्री करा म्हणून किती लाचारी करायची? बरं हे वरती पंतप्रधानांनादेखील माहिती नसेल की खाली काय चाटुगिरी चालू आहे अशी खोचक टीका राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केली.

# आमदारांनी विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचार केल्याची टीका

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत गद्दारी खपवून घेणार नाही–साळुंके

दैनिक वादळ वार्ता
**नदीम पटेल । निलंगा**

विधानसभा निवडणुकीत काही जणांनी न कळत तर काहींनी ठरवून गद्दारी केली. त्या सर्वांनी माफी दिली मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आहेत. पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे पैसे घामाच्या कष्टाचे आहेत. त्यांच्या निवडणुकीत जीव ओतून आम्ही काम करणार आहोत. त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी रक्ताचे पाणी करू मात्र या निवडणुकीत जर जर कोणी गद्दारी करण्याचा प्रयत्न केला तर खपवून घेणार नाही असा सज्जड इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात दिला.निलंगा येथील वृध्दावन मंगलकार्यालयात आयोजीत मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर खा. डॉ. शिवाजीराव काळगे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख, प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, प्रदेश सचिव कल्याण पाटील, जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, काँग्रेस नेते मल्लिकार्जुन मानकरी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना अभय साळुंके म्हणाले निलंगा विधानसभेच्या आमदारांनी विकासाच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार केला. एकाच रस्त्यावर अनेकदा रस्ते करून बील लाटण्याचे काम केले. आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत मध्ये काम करताना आडचण निर्माण केली. या आडचणीतून मुक्त करण्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत काँग्रेसचा झेंडा फडकावणे आवश्यक असून तिन्ही तालुक्यातील सर्वच ठिकाणी



काँग्रेस आपला झेंडा रोवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कॉंग्रेस मेळाव्यात व्यासपीठावर खा. डॉ. शिवाजीराव काळगे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख उपस्थितीत होते.काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पक्षातील गद्दारांचा शोध घेण्याच्या सूचना पक्षाला दिल्या असून पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना पक्षात उमेदवारी तर सोडा साधा थारा मिळणार नाही अशी स्पष्ट भूमिका जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख यांनी जाहीर करत शिफारशीवर उमेदवारी मिळणार नाही तर विजयी मिरीटवर उमेदवारी दिली जाणार असल्याचे जाहीर केले. तसेच जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या कामाचे कौतुक करत देशातील टॉप टेन जिल्हाध्यक्षामध्ये अभय साळुंके यांची गगणा होत असल्याचे त्यांनी देशमुख यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काँग्रेसचा झेंडा फडकणार राज्य आणि केंद्र सरकारच्या फसव्या आश्वासनाला येथील जनता कंठाळून गेली असून शेतकरी, शेतमजूर व तरुण बेरोजगारांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भाजप सरकारला जनता अद्दल घडविणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत सर्वच पातळीवर काँग्रेसचा झेंडा फडकणार असा विश्वास खासदार डॉ शिवाजीराव काळगे यांनी व्यक्त केला.

## गुरुकुल पब्लिक स्कूल, करमाळा याचा ओम अमोल नरुटे याने धनुर्विद्या स्पर्धेत रौप्य पदक मिळवून परचम लहरवला

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील डीग्रज येथे २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत गुरुकुल पब्लिक स्कूल, करमाळा याच्या विद्यार्थ्याने उत्कृष्ट कामगिरी करून संस्थेचे नाव रोशन केले आहे. १४ वर्षांखालील मुलांच्या रिकव्हर राउंड प्रकारात स्पर्धा करणाऱ्या ओम अमोल नरुटे याने ६८५ गुण मिळवून वैयक्तिक स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. या विजयामुळे त्याने वाराणसी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी देखील स्वतःचे स्थान निश्चित केले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

ओमच्या या यशाने गुरुकुल पब्लिक स्कूल, करमाळा याचे नाव तालुका पातळीवर खेळक्रीडेतील सद्भावना कायम राहिली आहे,



याची साक्ष पटली आहे. संस्थेचे अध्यक्ष भोगे, सचिवा सौ. भोगे HOD शिंदे , पवार यांनी ओम याचे अभिनंदन केले आणि पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. ओमला या स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षक सागर शिरस्कर यांचे मार्गदर्शन लाभले होते.गेली २–३ वर्षे ओम सारखे विजयी खेळाडू दररोज तीन ते पाच तास सराव करून आपली कौशल्ये विकसित करत आहेत, असे संस्थेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

## आगामी जि.प,पंचायतसमिती निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी कांग्रेस पक्ष कार्यालयात अर्ज सादर करावेत–खोडसे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सूचने वरून व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ,राज्यसभा खासदार रजनीताई पाटील,माजी मंत्री अशोकराव पाटील,प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य पाटील यांच्या नेतृत्वाखाली आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुका काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार असून महाविकास आघाडीतील काही घटक पक्षाच्या इच्छुक उमेदवाराकडून अमुक जागा,अमुक पक्षाची असल्याचे दर्शवून जनतेची दिशाभूल केली जात आहे.अद्याप महा विकास आघाडीची कसल्याही प्रकारची चर्चा झालेली नसून आघाडीचा कुठलाही प्रस्ताव मिळालेला नाही.त्यामुळे कुठलीहीजागा,कुठल्याही पक्षाला आघाडीत सुटलेली नसून काँग्रेस पक्षाकडे सर्व जागेवर लढण्यासाठी अतिशय चांगले उमेदवार



इच्छुक आहेत.त्यामुळे काँग्रेस पक्ष सर्व जागा स्वबळावर लढणारा असून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज करावेत असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी केले आहे.

जिल्हा परिषद,पंचायत समिती पदाकरिता काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवू इच्छित असलेल्या सर्व इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करावेत असे आवाहन केज तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रवीण खोडसे पाटील यांनी केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथेचे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मराठी संतपरंपरेतील आद्य संत आणि ज्ञान योगाचे प्रणेते संत



ज्ञानेश्वर महाराज यांच्या साडे सातशेव्या जन्मजयंती निमित्त बीड शहरात भव्य संत ज्ञानेश्वर जीवन चरित्र कथा आयोजित करण्यात आली आहे.स्व. झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने ५ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे.दररोज सकाळी १० ते सायंकाळी १० वाजेपर्यंत अखंड भक्तीचा सोहळा रंगणार असून,परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. आध्यात्मिक ज्ञान आणि भक्तीचा संगम घडवणारी ही कथा भाविकांसाठी सद्गुणप्रेरित जीवनाची दिशा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## वंचित बहुजन आघाडी संदीप जाधवचे पेठबीड भागात कार्यालयाचे अजय सरवदे यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील प्रस्थापितांना धडा शिकवण्यासाठी वंचित बहुजन आघाडी सज्ज झाली आहे. या उद्घाटन सोहळ्याला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू) वीर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेशकुमार जोगदंड, युवा नेते प्रकाश उजगरे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, माथाडी विंगचे जिल्हाध्यक्ष आकाश जावळे, बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड, युवा शहर उपाध्यक्ष सुशील काकडे, युवा नेते प्रेम कांबळे यांच्यासह त्या भागातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी उपस्थित जनतेस, महिला




बांधवांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, वंचित बहुजन आघाडी हा पक्ष वंचित आणि शोषित पिढीचा आहे. आपले प्रश्न आपणच सोडवायचे आहेत, म्हणून या पक्षाच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहा. दुसऱ्याच्या बंगल्यात जाण्यापेक्षा स्वतःची झोपडी शाबूत ठेवा असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मोलाचा संदेश आहे. परंतु आज बीडमधील काही लोक आंबेडकरी चळवळीच्या नावाखाली फक्त सोंग घेतात. स्वतःची झोपडी तुटली तरी चालेल पण बीडमधला बंगला उभा राहावा म्हणून ते त्याच्याच अधिपत्याखाली काम करतात. आता मात्र वंचित बहुजन आघाडी हा पक्ष वंचित आणि शोषित घटकांना एकत्र आणणारा व त्यांचा खरा आवाज बनलेला आहे. महाबोधी महाविहार आंदोलनाच्या काळात बीडमधील आंबेडकरी कार्यकर्त्यांना समाधानासाठी साथ देणारे योगेश क्षीरसागर किंवा आमदार संदीप क्षीरसागर हे केवळ तुमची मते घेण्यासाठीच समोर येतात पण संघर्षाच्या वेळी ते कधीच सहभागी होत नाहीत. बंगल्याच्या अधिपत्याखाली निवडून आलेले नगरसेवक आपल्याच युवकांना वाढदिवसांच्या निमित्ताने व्यसनाधीन करून त्यांचे भवितव्य नष्ट करतात. अशा नगरसेवकांना पुन्हा कधीही निवडून देऊ नका, अशी घणाघाती टीका वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी शहर महासचिव संदीप जाधव यांनी उघडलेल्या पक्ष कार्यालयाच्या फलकावर लवकरच नगरसेवक ही पदवी लागेल, असा विश्वास व्यक्त करत मतदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे, अशी विनंती केली. तसेच सर्व उपस्थितांनी संदीप जाधव यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## वैजापूर तालुक्यात काँग्रेस पुन्हा सज्ज–लासुर सर्कलमध्ये शक्ती प्रदर्शन



दैनिक वादळ वार्ता
**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यात काँग्रेस पक्षाला कोणीच वाली नाही अशी चर्चा करणाऱ्यांना आज प्रत्युत्तर मिळाले. कारण लासुर जिल्हा परिषद सर्कल काँग्रेस कमिटीच्या बैठकीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी ठामपणे जाहीर केले की, काँग्रेस पक्ष पहिलेही होता आणि आजही आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका काँग्रेस पक्ष स्वतंत्रपणे लढवेल, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.या आढावा बैठकीस वैजापूर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस प्रभारी मा. गुणवंत होळकर साहेब व वैजापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल संत यांच्या प्रमुख उपस्थिती होती. ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष दिगंबर वाघचौरे यांनी बैठकीचे नियोजन केले.या बैठकीस गणेश आवारे, भाऊसाहेब मांजरे, ज्ञानेश्वर थोरात, किरण राजपूत, चंदन राजपूत, राहुल जगताप, भगवान गाजरे, उद्धव काळे, संदीप डुकरे, रवी गायकवाड, रवींद्र मोकळे, भाऊसाहेब शेलार, अण्णासाहेब रोटे, दिलीप जाधव, ज्ञानेश्वर निगोटे, संतोष रिठे यांसह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी आभार प्रदर्शन गणेश पा. आवारे यांनी केले.

## वडगाव येथे रब्बी हरबरा बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । मंगेश पाटील**

वडगाव ता.शहादा जि.नंदुरबार येथे कृषि विभागा मार्फत रब्बी हंगाम गाव बैठक घेऊन हरबरा ,गहु , रब्बी ज्वारी बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक आयोजन करण्यात आले यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी सुनील सुळे यांनी उपस्थित शेतकर्याना राज्यात आता रब्बी हंगामाला सुरुवात असुन रब्बीचे मुख्य पिक असलेले हरबरा ,गहू , ज्वारी पिकाचे पेरण्यांना वेग येतोय खरीप हंगाम नंतर व यंदाच्या अवकाळी व सततसच्या पावसामुळे जमिनीतुन अनेक किड आणी रोगाचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते.हे टाळण्यासाठी बियाणाचे पेरणीपुर्वी बिजप्रक्रिया करणे खुप गरजेचे असते बिजप्रक्रियामुळे .पिकाचे किड/रोगा पासुन संरक्षण होत उगवण चांगली होते उत्पादनातही वाढ होते. बिज प्रक्रिया म्हणजे काय सोपे भाषेत बिज प्रक्रिया म्हणजे लसीकरण कोणतेही रोग होऊ नये म्हणुन जसे आपण लस टोचुन घेतो त्याच प्रकारे जमिनीतुन होणारे रोग आणी किडीचे प्रार्दुभाव आपण रोखण्यासाठी पेरणीपुर्वी बियाणेवर प्रक्रिया करणे सेंद्रिय व रासायनिक बुरशीनाशके किटकनाशके यांचा द्रावणात




लेप लावुन पेरणी करणे बिज प्रक्रियामुळे वीस ते पंचवीस टक्के नत्राचे बचत होते दहा ते पंधरा टक्के उत्पन्नात वाढ होऊन किड व रोगा पासुन मुक्त ठेवण्याचे काम बिज प्रक्रिया मुळे होते हरबरा प्रतिकिलो बियाण्यास ६ ग्राम ट्रॉयकोडर्माची बिजप्रक्रिया करावी ,रायझोबियम आणि स्पुरद विरघळवणारे जिवाणु २५० ग्राम प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावमध्ये मिसळावे बियाणे आर्धा तास सावलीत सुकवुन पेरणी करणे यामुळे मररोग ,नत्र स्थिरकरण व स्पुरद उपलब्धेते साठी ,रब्बी ज्वारी ३ किलो मीठ १० लिटर पाण्यात मिसळावे ३० टक्के मीठाचे द्रावण या द्रावणात बियाणे ओतावे , माहाडीबीटी अंतर्गत ट्रॉक्टर ,औजारे ,पॉकहाऊस ,कांदाचाळ ,शेडनेट,ठिंबक सिंचन योजना कागदपत्रे व हमीपत्र ,बंधपत्र,सामाईक खातेदार सम्मंत्री पत्रासह सह अपलोड करणे आदि योजने बाबत माहिती दिली यावेळी सरपंच दिनेश पावरा ,उपसरपंच विजय सोनवणे , मा.पंचायत समिती सदस्य प्रकाश नावडे ,ग्राम पंचायत सदस्य पवन सुळे ,वन समिती अध्यक्ष दिलीप वळवी माजी सरपंच रमेश जाधव ,प्रगतिशील शेतकरी संजय वळवी ,सतोंष सुळे नानसिंग भिल , सायसिंग पावरा आनंद वळवी ,दिपक घोडसे आदी शेतकरी उपस्थित होते,

### देगाव येथील शेतकऱ्यांचा संताप कृषी सहाय्यक व तलाठींच्या

## निष्काळजीपणाविरोधात कृषी अधिकारी व तहसीलदार यांना दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील देगाव (मौजा सजेवर) येथील शेतकऱ्यांनी पंचनामे योग्यरीत्या न करणाऱ्या कृषी सहाय्यक व तलाठी यांच्या कामचुकारपणाबाबत नायब तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी योगेश सोनवणे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.




नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे मका, सोयाबीन, कपाशी, बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शासनाच्या मदत योजनांसाठी पंचनामे करणे अत्यंत आवश्यक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी गंभीर दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार, पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती वेळेवर देऊनही कृषी सहाय्यक व तलाठी यांनी पंचनामे करण्यास नकार दिला किंवा विलंब लावला. इतकेच नव्हे, तर दोन्ही अधिकारी अनेकदा मुख्यालयावर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या महत्त्वाच्या सेवांपासून वंचित राहावे लागत आहे. विशेष म्हणजे, कृषी सहाय्यकाने स्पष्टपणे सांगितल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे की – ज्यांचे फोन येतील, त्यांचेच पंचनामे केले जातील. मोबाईल संपर्क नसलेल्या किंवा दुर्गम भागातील अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे न झाल्याने अन्याय झाल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये प्रबळ आहे. या निष्काळजी वृत्तीमुळे विमा व शासनाच्या मदत प्रक्रियेत उशीर होत असून, नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता धूसर होत चालली आहे.शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत १. कृषी सहाय्यक व तलाठी यांच्याविरुद्ध तातडीने शिस्तभंगाची चौकशी व कायदेशीर कारवाई करावी. २. पंचनामे करण्यासाठी त्वरित सक्षम अधिकारी व मनुष्यबळ तैनात करावे. ३. अद्याप पंचनामे न झालेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करून ती संबंधित अधिकारी व जिल्हा प्रशासनाला पाठवावी. ४. भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून संबंधित कर्मचाऱ्यांवर ठोस देखरेख ठेवावी. ५. शेतकऱ्यांना राज्य व केंद्र शासनाच्या योजनांनुसार तात्काळ हानीभरपाई मिळावी यासाठी उपाययोजना कराव्यात. शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, योग्य कार्यवाही न झाल्यास ते आपला हक्क मिळवण्यासाठी आंदोलनाचा मार्ग अवलंबतील. मात्र त्यांनी प्रशासनाकडे न्यायालयीन व कायदेशीर मार्गाने त्वरीत न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या तक्रारीमुळे तालुक्यातील कृषी विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने त्वरित तपास करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी स्थानिक पातळीवर होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077